| जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट - www.nanded.gov.in | E-mail- nandedrdc@ gmil.com |
| Phone ०२४६२-२३५०७७ | Fax No- ०२४६२-२३८५०० शाखा - महसूल १ |
| क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१/सिआर | दिनांक ३०.०३.२०२० |

प्रति,

१) उप प्रादेशीक परिवहन अधिकारी, नांदेड.
२) प्रादेशीक अधिकारी, महा. औद्यो. विकास महामंडळ, नांदेड.
३) सहायक कामगार आयुक्त, नांदेड.

**विषयः- COVID-१९ विषाणुंचा प्रादुर्भाव- लॉकडाऊन कालावधीत जीवनावश्यक वस्तुंचे उत्पादन व पुरवठा संबंधीत उद्योग, कारखाने कार्यान्वीत ठेवणे बाबत.**

**संदर्भः-** १) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दिनांक २९.०३.२०२०
२) या कार्यालयाचे सम क्रमांकीत आदेश दि. २६/३/२०२०

विषयांकीत प्रकरणी कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आलेल्या लॉकडाऊन कालावधीत जीवनावश्यक वस्तुंचे उत्पादन व पुरवठा सुरळीत ठेवणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने आपणांस खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

| अ.क्रं. | कार्यान्वयीन यंत्रणा | करावयाची कामे |
|---|---|---|
| १ | श्री अविनाश राऊत उप प्रादेशीक परिवहन अधिकारी, नांदेड मो. क्रं. ९८२२२४६०२३ | या कार्यालयाचे आदेश दि. २६/३/२०२० अन्वये उप प्रादेशीक परिवहन अधिकारी यांना आंतरराज्य/ आंतरजिल्हा / आंतर तालुका वाहतुक नियंत्रण व त्या संबंधाने येणा-या तक्रारी सोडविण्याची जबाबदारी देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने लॉकडाऊनच्या कालावधीत जीवनावश्यक वस्तुंचे वाहतुकी संबंधाने आवश्यक ती कामे पार पाडणे. |
| २ | श्री भिंगारे, प्रादेशीक अधिकारी, महा. औद्यो. विकास महामंडळ, नांदेड मो. क्रं. ९९७५५९७७११<br>श्री व्यंकट मुदे, कार्यकारी अभियंता, महा. औद्यो. विकास महामंडळ, नांदेड मो. क्रं.८८३००३३९३० | लॉकडाऊनच्या कालावधीत जीवनावश्यक वस्तुंचे सतत उत्पादन / प्रक्रिया करणारे विविध कारखाने/उद्योग तसेच सदर वस्तुंची पुरवठा करणारी मोठी घाऊक विक्रेते यांची आस्थापना सदर कालावधीत चालू राहतील याची दक्षता घ्यावी व त्यानुषंगाने विविध उपाययोजना करणे. तसेच सदर विविध कारखाने/उद्योग तसेच सदर वस्तुंची पुरवठा करणारी मोठी घाऊक विक्रेते यांना आवश्यक असणारा कामगार वर्ग उपलब्ध न झाल्यास सहायक कामगार आयुक्त यांचेशी समन्वय साधून आवश्यक कार्यवाही करणे. |
| ३ | श्री सय्यद मोहसीन सहायक कामगार आयुक्त, नांदेड मो. क्रं. ७२७६२१६०६६ | लॉकडाऊनच्या कालावधीत जीवनावश्यक वस्तुंचे सतत उत्पादन / प्रक्रिया करणारे विविध कारखाने/उद्योग तसेच सदर वस्तुंची पुरवठा करणारी मोठी घाऊक विक्रेते यांची आस्थापना यांना आवश्यक असणारा कामगार वर्ग उपलब्ध न झाल्यास सदर कामगार उपलब्धते बाबत आवश्यक कार्यवाही करणे. तसेच Lock Down मुळे उद्भवणा-या कामगारांशी संबंधित अतर अडचणी संबंधाने समन्वयक म्हणून कार्यवाही करणे. |

Scanned by CamScanner

उपरोक्त प्रमाणे अनुषंगीक कामे पार पाडताना कोरोना विषाणुंचा प्रादुर्भाव रोखण्या संबंधाने यापूर्वी वेळोवेळी निर्गत करण्यात आलेले शासन निर्णय/ विविध परिपत्रके/ या कार्यालयाचे आदेशातील नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून आवश्यक ती कार्यवाही करावी.

या कामात कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांच्या कडून कुचराई/दिरंगाई केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे विरुध्द महाराष्ट्र कोव्हीड -१९ उपायोजना नियम २०२० मधील तरतुद व आपत्ती व्यवस्थापना अधिनियम २००५ च्या कलम ५१ व इतर अनुषंगिक कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

स्वा/-

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
३) पोलीस अधीक्षक, नांदेड
४) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
५) तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

OFFICE OF THE COLLECTOR NANDED.

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

Scanned by CamScanner